पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे
नविन मध्यवर्ती इमारत, ३ रा मजला, पुणे
Ph No- ०२०- २६१२६६२८/२६१२३९८५
Gmail- dirmktms@gmail.com Website- mahapanan.maharashtra.gov.in

---

जा.क्र.पणन-५/कृउबास /नोकर भरती /निर्देश /सन २०१९ /5945471 दिनांक २८/११/२०१९

विषय :- महाराष्ट्र राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आस्थापनेवरील रिक्त असलेली पदे सरळ सेवेव्दारे भरती करणेबाबत .

संदर्भ :- मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी रिट पिटीशन क्रमांक ६१४३/२०१८ व इतर संलग्न रिट मध्ये दिलेले निर्देश.

## -: प्रस्तावना :-

महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ३५(१) अन्वये कृषि उत्पन्न बाजार समितीला बाजाराच्या व्यवस्थेसाठी, पिकांविषयची आकडेवारी व बाजार वृत्त गोळा करुन, तिचा प्रसार करणे व देखभाल करणे व तद्अनुषंगिक व्यवस्थापन यासाठी आवश्यक असेल असे अधिकारी व कर्मचारी भरती करण्याचा अधिकार आहे. असे अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे नियम १०० मध्ये तरतूदी नमूद केल्या आहेत.

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील रिट पिटीशन क्रमांक ६१४३/२०१८ व इतर संलग्न रिट पिटीशनमध्ये असे निर्देश दिले आहेत की, राज्यातील सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी रोजंदारी कर्मचा-यांची भरती करताना पणन संचालक यांची पूर्व मान्यता घेण्यात यावी, तसेच नियमित कर्मचारी भरती करताना किंवा रोजंदारीवरील कर्मचारी नेमणूक करताना स्थानिक भाषेतील जिल्हयातील सर्वात जास्त खपाच्या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात यावी आणि कोणत्याही परिस्थितीत कमी खपाच्या किंवा अपरिचित वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येवू नये असे सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांना निर्देश पणन संचालक यांचे मार्फत देण्यात यावेत.

मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्देशांचे अनुषंगाने राज्यातील सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांना त्यांचे आस्थापनेवरील रिक्त असलेली पदे सरळ सेवेने भरती करणेबाबत तसेच कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये जास्त काम असलेल्या हंगामात गरज पडल्यास रोजंदारी कर्मचारी भरती करण्याची आवश्यकता असल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

## -: निर्देश :-

महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी -विक्री (विकास व विनियमन) अधिनियम,१९६३ चे कलम ४०(ई) अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार मी डॉ.किशोर तोष्णिवाल, पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे , राज्यातील सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांना खालील प्रमाणे निर्देश देत आहे.

१. महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी - विक्री (विकास व विनियमन)नियम,१९६७ चे नियम १०० मध्ये तरतुद केलेप्रमाणे बाजार समितीच्या कर्मचारी वर्गाची (एक) अधिकारी (दोन) वरिष्ठ सेवक (तीन) कनिष्ठ सेवक अशा तीन वर्गामध्ये विभागणी करण्यात यावी. अशा प्रकारे बाजार समितीस आवश्यक असलेल्या पदांची सेवक सूची तयार करावी .

२. निरनिराळी पदे व वेतनमान, अर्हता इत्यादीची अनुसूची, सेवाप्रवेशापूर्वी पणन संचालकाकडून मान्य करुन घेण्यात यावी.

३. बाजार समितीच्या उपविधी अन्वये स्थापन केलेली एक कर्मचारी वर्ग सेवा प्रवेश उपसमिती असेल. बाजार समितीने शासकीय धोरणानुसार अनुसूचित जाती जमाती, मागासवर्गीय, अथवा इतर मागास वर्गीय

(PTO)

Scanned with CamScanner

आणि आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी तसेच अंध अपंग यांचेसाठी जागा राखुन ठेवाव्यात व याबाबत बाजार समितीने विहीत नमुन्यात बिंदु नामावली (रोस्टर) तयार करुन त्यास मागास वर्गीय कक्षाकडून प्रमाणित करुन घेण्यात यावी. अशा जागेवर भरती करण्यासाठी विहील पात्रता धारण करणा-या उमेदवारांची यादी संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य किंवा संबधित समाजकल्याण अधिकारी यांचेकडून मागवून घेण्यात यावी व त्या कार्यालयाकडे योग्य उमेदवार उपलब्ध नसतील तर त्या पदासाठी वर्तमान पत्रात जाहिरात देवून सरळ प्रवेशाव्दारे नियुक्ती करण्यात यावी. तसेच मागासवर्गीयाचा अनुशेश असलेल्या पदावर प्रथम प्राधान्याने भरती करणे आवश्यक राहील. सेवाप्रवेश उपसमितीने शिफारस केल्याखेरीज कोणतीही व्यक्ती कोणंत्याही पदावर सरळ सेवेव्दारे नियुक्ती केली जाणार नाही.

४. अधिकारी व वरिष्ठ कर्मचारी यांची नेमणूक १८ वर्षापेक्षा कमी नसेल व ३० वर्षापेक्षा अधिक नसेल अशा वयोमर्यादेतील उमेदवारांमधून करण्यात येईल आणि कनिष्ठ कर्मचा-यांचे बाबतीत वयोमर्यादा १८ वर्षापेक्षा कमी व ३५ वर्षापेक्षा अधिक असणार नाही.सदरील वयोमर्यादा पुढील बाबतीत पाच वर्षापर्यंत शिथिल करता येईल.

(अ) मागासर्गीय उमेदवार तसेच अंध अपंग उमेदवार यांचेबाबतीत वर विहित केलेली वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिल करता येईल.

(ब) ज्या उमेदवारांने बाजार समितीस किंवा एखादया संघटनेत तीन वर्ष अखंड सेवा केली असेल असा उमेदवार.

(क) संचालकांना मान्यता व मंजूरी दिलेले प्रशिक्षण घेतलेले उमेदवार,

(ड) माजी सैनिक

(इ)अतिउच्च अर्हता असलेला व बाजार समितीच्या किंवा सहकारी चळवळीच्या कामकाजात अन्यसाधारण असलेला उमेदवार.

५. अधिकारी, वरिष्ठ कर्मचारी व कनिष्ठ कर्मचारी यांच्या प्रथम नियुक्तीसाठी किमानं अर्हता पुढील प्रमाणे असेल:-

(अ) सचिव :-बी.एससी, (कृषी) किंवा बी.कॉम किंवा बी.ए (अर्थशास्त्र) किंवा एल.एल.बी.

(ब)सहाय्यक सचिव :- पदवीधर किंवा समकक्ष

(क)हिशेबनीस:- एस.एस.सी. व जी.डी.सी.अॅण्ड ए. इतर पदासाठी म्हणजे कोषाध्यक्ष,प्रमुख लिपिक,वरिष्ठ लिपिक,पर्यवेक्षक , निरिक्षक, प्रतवारीकार व लिपिक एस.एस.सी किंवा तस्समतुल्य परीक्षा

६. बाजार समितीने शासकीय धोरणानुसार अंध,अपंगासाठी आवश्यक तितक्या जागा राखीव ठेवण्यात याव्यात व या पदाचा अनुशेश असेल तर प्रथम प्राधान्याने भरती करावी.

७. बाजार समितीच्या आस्थापनेवर रिक्त असलेल्या कनिष्ठ कर्मचा-याची पदे १००%सरळ सेवा पध्दतीने भरण्यात यावीत. वरिष्ठ कर्मचा-यांची पदे भरताना ७५% पदोन्नतीने व २५% सरळ सेवा पध्दतीने भरण्यात यावीत.

८. सरळ सेवा पध्दतीने कर्मचारी भरती करताना खालील प्रमाणे कार्यपध्दती अंवलबण्यात यावी.

अ. बाजार समितीच्या पणन संचालकांनी मंजूर केलेल्या सेवक अनुसूचि (स्टाफ शेडयुल) प्रमाणे रिक्त पदाचा आढावा घ्यावा.

ब. बाजार समितीचा आस्थापना खर्च किती आहे यांचा आढावा घेवून, आस्थापना खर्च विहीत मर्यादेत ठेवून जितकी पदे भरता येणे शक्य आहे तेवढीच पदे भरणेची कार्यवाही करावी.

क. उमेदवार भरती प्रक्रिया राबविणेपूर्वी याबाबत संपूर्ण व स्वयंस्पष्ट प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना सादर करुन, त्यांची मान्यता मिळालेनंतरच भरती प्रक्रिया राबविण्यास सुरुवात करावी.

Scanned with CamScanner

ड. जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था यांनी बाजार समितीची पणन संचालक यांनी मंजुर केलेली सेवक सूची, रोस्टर मंजुरी, रिक्त पदे, आस्थापना खर्च, बाजार समितीची आर्थिक स्थिती, मागासवर्गीय /अंध अपंग यांचेसाठी राखीव असलेल्या जागा, अनुशेष इ. बाबींची पडताळणी करुन भरती प्रक्रिया राबविणेसाठी मंजूरी दयावी.

इ. रिक्त पदे भरताना संबधित रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडून (सेवायोजन कार्यालय) जेष्ठेते नुसार पात्र उमेदवारांची यादी प्राप्त करुन घ्यावी.मागासवर्गीयसाठी राखिव असलेल्या पदांसाठी समाज कल्याण कार्यालय /आदिवासी विकास विभाग कार्यालयाकडून पात्र उमेदवारांच्या यादया प्राप्त करुन घेणेत यावेत.

ई. रिक्त पदे भरणेबाबत वर्तमान पत्रात तपशिलवार जाहीरात देण्यात यावी.याबाबत मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील रिट याचिका क्रमांक ६१४३/२०१८ मध्ये आदेशीत केल्याप्रमाणे अशी जाहिरात देताना जिल्हयातील सर्वात जास्त खप असलेल्या स्थनिक भाषेतील दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीमध्ये कमी खप असलेल्या किंवा अपरिचित वर्तमान पत्रात किंवा साप्ताहिकात जाहिरात देण्यात येवू नये.

उ. वरिष्ठ सेवकांची रिक्त पदे भरताना मौखिक परिक्षा घेण्यात येवू नये.त्यासाठी २०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात यावी.ज्या पदांसाठी लेखी व परिक्षा व व्यवसायिक चाचणी घेणे आवश्यक असेल अशा पदांसाठी १२० गुणांची लेखी परिक्षा व ८० गुणांची व्यवसायिक चाचणी अशा पध्दतीने परिक्षा घेण्यात यावी.

ऊ. लेखी परिक्षेसाठी पुढील प्रमाणे प्रश्नपत्रिका ठेवण्यात यावी.

i. ज्या पदाकरीता कमीत कमी अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १० वी) आहे अशा पदांकरिता परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परीक्षेला मराठी,इंग्रजी,सामान्य ज्ञान व अंकगणित यां विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

ii. ज्या पदाकरिता पदवी ही कमीत कमी अर्हता आहे अशा पदांकरिता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील.परंतु मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२वी) समान राहील.
लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी,सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

iii. ज्या पदांसाठी फक्त लेखी परीक्षा घेऊन निवड करावयाची आहे अशा पदांसाठी मराठी,इंग्रजी,सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून २०० गुणांची लेखी परिक्षा घेऊन निवड करण्यात यावी. निवड होणा-या उमेदवारांना संबंधित जिल्हयाचा भूगोल, सामाजिक इतिहास, हवामान इ. स्थनिक बाबींची माहिती असणे आवश्यक आहे. यास्तव सामान्य ज्ञान या विषयाची प्रश्नपत्रिका तयार करताना सदर बाब विचारात घेण्यात यावी.
वरील परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास २ गुण ठेवण्यात यावेत.

९. अशा प्रकारे सरळ सेवेने भरती करण्यासाठी बाजार समिती आवश्यकता वाटल्यास शासन मान्यता प्राप्त एजन्सीची, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांचे मान्यतेने नेमणूक करु शकेल.

१०. अशा प्रकारे पारदर्शकरित्या भरती प्रक्रिया राबवून नियुक्त देण्यास पात्र ठरलेल्या उमेदवारांची संपुर्ण माहिती आणि भरती करण्यासाठी अवलंब करण्यात आलेल्या प्रक्रियेची माहिती संबधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना सादर करुन, त्यांची मंजूरी मिळाल्यानंतरच सदर उमेदवारांना प्रथम ६ महिने परीविक्षाधीन कालावधीसाठी नियुक्ती देण्यात यावी.

११. बाजार समितीने कोणत्याही परिस्थितीमध्ये रोजदांरी कर्मचा-यांची नेमणूक करु नये. जादा काम असलेल्या काळात किंवा विशिष्ट हंगामात जादा काम करणेसाठी सेवकांची गरज पडली तरी असे सेवक नियम १००(५) मधील तरतुदीनूसार, ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी घेण्यात येवू नयेत.तसेच अशा प्रकारे

Scanned with CamScanner

अशा विशिष्ट कालावधीसाठी रोजंदारी कर्मचारी घेताना त्यासाठी मा. उच्च न्यायालयाने नमूद केल्याप्रमाणे, वर्तमान पत्रात जाहीरात देवून अशा सेवकांची नेमणूक करण्यात यावी. विशिष्ट परिस्थितीमध्ये ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी अशा प्रकारे कर्मचारी घेण्याची गरज पडल्यास मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी आदेशित केल्याप्रमाणे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या मंजुरीने अशा प्रकारे पुनश्च: पुढील कामासाठी रोजंदारी कर्मचारी घेता येतील.

१२. कर्मचारी भरती करताना याबाबतचे शासन निर्णय, बाजार समितीचे पोटनियम, सेवा नियम यामधील तरतुदीचे काटेकोरपणे पालन करुनच कर्मचारी भरती करण्यात यावी. अशा प्रकारे कर्मचारी भरती केल्यामुळे बाजार समितीचा आस्थापना खर्च विहीत मर्यादेत राहील याची दक्षता घेण्यात यावी.

सदरचे निर्देश या निर्देशाच्या दिनांकापासून तात्काळ प्रभावाने अंमलात येतील व यापुर्वी या कार्यालयाकडील बाजार समितीच्या नोकर भरतीच्या संबधीचे सर्व परिपत्रके व्यपगत करण्यात होतील.

दिनांक२८ /११/२०१९
ठिकाण: - पुणे

(डॉ.किशोर तोष्णिवाल)
पणन संचालक
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति:-
सभापती /सचिव /प्रशासक, कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व )-------

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :
१.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)---------------
२.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,(सर्व)-----------------

प्रत माहितीस्तव सविनय सादर:
मा. प्रधान सचिव (पणन) मंत्रालय,मुंबई -३२

प्रत माहितीस्तव सादर:-
१ .मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,५८३-ब, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे-३७
२. मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या, मुंबई कनमूर हाऊस, नरसीनाथा स्ट्रीट, पोस्ट बॉक्स नं.५०८०, मस्जिद बंदर, मुंबई - ४०००९
३. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे

Scanned with CamScanner